दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

**वृत्तविशेष क्र.** 15 **दिनांक :** 12, **एप्रिल** 2019

## समशाद नगर येथील अनधिकृत बांधकामावर ठाणे महापालिकेची धडक कारवाई

ठाणे(१२): लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या कामकाजात व्यस्त असणाऱ्या अधिकारी,कर्मचाऱ्यांचा गैरफायदा घेवून मुंब्रा प्रभाग समितीतील समशाद नगर येथील शंकर मंदिर रोडवरील शिवसेना शाखेमागे बांधण्यात आलेल्या ४ मजली इमारतीच्या अनधिकृत पाचव्या मजल्याचे आरसीसी कॉलम, स्लॅब व विटांचे बांधकाम आज ठाणे महापालिकेच्यावतीने तोडण्यात आले.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याचे आदेश महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांनी दिल्यानंतर अतिक्रमण विरोधी पथकामार्फत मुंब्रा प्रभाग समितीक्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई करण्यात येत आहे.

आज मुंब्रा परिसरातील कारवाई दरम्यान समशाद नगर येथील शंकर मंदिर रोड,शिवसेना शाखेमागे असलेल्या ४ मजली इमारतीच्या अनधिकृत पाचव्या मजल्याचे आरसीसी कॉलम, स्लॅब व विटांचे बांधकाम गॅस कटरच्या साहाय्याने तोडण्यात आले.सदरची कारवाई उप आयुक्त अशोक बुरपल्ले व मनीष जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली मुंब्रा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त महेश आहेर यांनी अमित गडकरी, जितेंद्र साबळे यांच्या साहाय्याने केली असून यापुढेही निवडणूक कामकाज सांभाळून आचरसंहिता दरम्यानही शहरातील अनधिकृत बांधकामे, फेरीवाले,हातगाड्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.